MHGA030012692023

**<u>न्यायदंडाधिकारी, प्रथम श्रेणी, गडचिरोली यांचे न्यायालयात</u>**
(पिठासीन अधिकारी चं. प्र. रघुवंशी)

**<u>नि.फौ.ख.क्रं.१५०/२०२३</u>**

करमचंद प्रकाशसिंग
वय २२ वर्षे,
रा. कालका, राज्य हरियाणा. ... **<u>अर्जदार/आरोपी</u>**

**<u>विरूध्द</u>**

महाराष्ट्र शासन,
मार्फत विभागीय वन अधिकारी,
गडचिरोली. ... **<u>गैरअर्जदार</u>**

.........................................................................................

अर्जदारातर्फे : विधिज्ञा श्रीमती एन.व्ही.इलमुलवार
गैरअर्जदारतर्फे : वि. सरकारी विधिज्ञ

---

**<u>नि.क्र. २६ वरील आदेश.</u>**
(दिनांक १६ डिसेंबर, २०२३)

१. अर्जदार यांनी सदरचा अर्ज प्रस्तुत प्रकरणात जप्त रेड-मी कंपनीचा काळया रंगाचा कव्हर असलेला मोबाईल व Kechaoda K112 चा साधा मोबाईल आय. एम. ई. आय. क्र. १) ८६६७७१०४५१८१४८३, २) ८६६७७१०४५१८१४९१ व ३) ८६६७७१०४५१८१५०९ आणि आधार कार्ड सुपूर्तनाम्यावर परत मिळण्याकरिता फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४५७ अन्वये या प्रकरणात दाखल केला आहे.

२. अर्जदाराचे थोडक्यात कथन असे आहे की, अर्जदाराच्या मालकीचे उपरोल्लेखीत मोबाईल व आधार कार्ड विभागीय वन अधिकारी, गडचिरोली यांनी प्रस्तुत अपराधामध्ये जप्त केले आहे.

अर्जदाराचे उपरोल्लेखीत वस्तु जप्त केल्यापासून, विभागीय वन अधिकारी, गडचिरोली यांच्या ताब्यात आहे. सदर मोबाईल व आधार कार्ड सुपूर्तनाम्यावर परत करतांना न्यायालयाने घालून दिलेल्या अटी व शर्तीचे पालन करण्यास अर्जदार तयार आहे. करिता, अर्जदाराने सदरचा अर्ज सादर केला आहे.

३. सदर अर्जावर चौकशी अधिका-यांचे व सहायक सरकारी वकीलांचे म्हणणे मागविण्यात आले. त्यांचे म्हणने असे की, सदर वस्तु हया वन्यजिव संरक्षण कायदयान्वये जप्त केल्या असुन त्यानुसार जप्त वस्तु या सरकारी मालमत्ता ठरतात. तसेच न्यायालयाला वन्यजिव संरक्षण कायदयाच्या कलम ५१(२) प्रमाणे सदर वस्तु सरकार जमा करण्याचे अधिकार आहेत. सदर वस्तु पुराव्याचा भाग आहेत. आरोपी त्यामध्ये बदल करून छेडछाड करतील आणि अर्ज मंजुर केल्यास आरोपी पुन्हा सदर मोबाईल वापरुन गुन्हा करतील. सबब, सदरचा सुपुर्दनाम्याचा अर्ज नामंजुर करण्यात यावा. इतर आरोपींनी अर्जास नाहरकत दिली.

४. अर्जदार/आरोपीने मोबाईल खरेदी बील दाखल केलेले नाही. त्यांनी शपथपत्राद्वारे त्यांच्या अर्जाला आधार दिला आहे. तपासी अधिकारी यांनी आधार कार्डबाबत काहीही भाष्य केलेले नाही. सदर शपथपत्र आणि ज्याअर्थी प्रस्तुत आरोपीकडून मोबाईल व आधार कार्ड जप्त झाले आहे त्याअर्थी, अर्जदार सदर मोबाईल व आधारकार्डचा मालक असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते.

५. वन्यजिव संरक्षण कायदयान्वये जप्त वस्तु या सरकारी मालमत्ता ठरतात. परंतु सुनावणी अंती दोषारोप सिध्द झाल्यावरच त्या वस्तु सरकारी मालमत्ता ठरवून न्यायालयाला सदर वस्तु सरकार जमा करता येतील. त्यामुळे सरकार पक्षाची सदर हरकत या घडीला मान्य करता येणार नाही.

६. अर्जदार न्यायालयाने घालून दिलेल्या अटीचे व शर्तीचे

पालन करण्यास तयार आहे. सदर मोबाईल व आधारकार्ड विभागीय वन अधिकारी, गडचिरोली यांच्या ताब्यात राहील्यास ते खराब होण्याची शक्यता नाकारता येत नाही. अशा परिस्थितीत, सदर अर्जदार/आरोपी हा सदर मोबाईल व आधारकार्डचा प्रथमदर्शनी मालक असल्याने अंतरिम ताब्यास पात्र आहे. म्हणून सदरचा मोबाईल व आधारकार्ड अर्जदारास अटी व शर्तीवर परत करणे न्यायाचे होईल. सबब, खालील प्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

**आदेश**

१. अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. अर्जदार/आरोपी करमचंद प्रकाशसिंग यांना विभागीय वन अधिकारी, गडचिरोली यांनी प्रस्तुत प्रकरणामधील जप्त रेड-मी कंपनीचा काळया रंगाचा मोबाईल कव्हर असलेला मोबाईल व Kechaoda K112 चा साधा मोबाईल आय.एम.ई.आय. क्र. ८६६७७१०४५१८१४८३, ८६६७७१०४५१८१४९१ व ८६६७७१०४५१८१५०९ आणि आधारकार्ड अंतरिम आदेशाप्रमाणे त्यांच्या ताब्यात खालील नमूद अटी व शर्तीस अधीन राहून त्यांनी रक्कम रुपये १५,०००/- चा सुपूर्तनामा <u>न्यायालयात</u> दिल्यावर देण्यात यावे.

(अ) अर्जदार यांनी प्रकरणाचा निकाल लागेपर्यंत जप्त मोबाईलची विल्हेवाट अगर विक्री, तारण करु नये व त्यांचे सीम कार्ड बदलवु नये.

(ब) न्यायालय आदेश करेल तेव्हा अर्जदार यांनी सदर दोन्ही मोबाईल स्वखर्चाने सादर करावे.

३. तपासणी अधिकारी यांनी जप्त मोबाईल सुपूर्तनाम्यावर देण्यापुर्वी त्यामधील संपुर्ण डाटा पुराव्याकामी आवश्यक असल्यास सुरक्षितरित्या संग्रहित करावा. नमुद मोबाईलचे प्रत्येकी दोन रंगीत फोटो काढून पंचनामा तयार करावा. तसेच आधारकार्डची एक सत्यप्रत तयार करून सत्यप्रत, फोटो व पंचनामा या प्रकरणात लगेच दाखल करावे.

स्वा/-
(चं. प्र. रघुवंशी)
प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी,
गडचिरोली.

गडचिरोली.
दि. १६/१२/२०२३.